**नि.दि.दा.क्र. ५६/२०१८** **नि. क्र.७४**

नावः उपेश शंकरराव अंबादे

वयः ४४ वर्षे, व्यवसायः नायब तहसिलदार, नझुल कामठी

राः चॉक्स कॉलोनी, नागपूर

**वादीतर्फे साक्षीदार क्र.३ यांचा सरतपास विधीज्ञ श्री. पी.एस. पुडके यांच्या तर्फे शपथेवर सुरु**

मला कोर्टामार्फत समन्स मिळाला होता. त्या समन्स वरुन मी बयान देण्यासाठी न्यायालयात हजर झालो. मिळकत क्रमांक एन.एल.५५ऐ च्या मालकी संदर्भात कागद पत्र मागविण्यात आले होते. मी शोध घेतला असता मिळकत क्रमांक एन.एल.५५ऐ हे नझुल लिज मिळकत नसल्याबाबतचे आढळून आले असा अहवाल मी न्यायालयात दाखल केला आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.७५** देण्यात येते. मिळकत नझुल लीज नाही परंतु मिळकत नझुल आहे किंवा नाही हे मला सांगता येणार नाही.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१, २, ४ व ५ तर्फे विधीज्ञ श्री. एस.आर. काळे यांनी नाकारला म्हणून उलटतपास काही नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.६ तर्फे विधीज्ञ श्री. एस.एम. कुशवाहा वकील यांच्यातर्फे शपथेवर सुरू**

मी मिळकत क्रमांक एन.एल.५५ऐ च्या जागेवर गेलो नव्हातो. मिळकत कोठे स्थीत आहे हे मला माहित नाही. मिळकत खाजगी आहे किंवा सरकारी आहे हे पण मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की ज्या जागेवर अतिक्रमण केले जाते व जागेची लीज केली जात नाही त्यास नझुल असे म्हटले जाते.

**प्रश्नः** ज्या जागेवर अतिक्रमण केले जाते त्यास कोणत्या नावाने ओळखले जाऊ शकते?

**उत्तरः** जागा खाजगी असु शकते, नगर पालीकेची असु शकते व मालिक मौजा असु शकते.

**प्रश्नः** तुम्हाला साक्षदार म्हणून बोलविण्यात आले होते का?

**उत्तरः** होय.

**प्रश्नः** नोटीस द्वारे तुम्हास काय आदेशीत करण्यात आले होते?

**उत्तरः** मिळकत क्रमांक एन.एल.५५ऐ संदर्भात आमच्या कार्यालयात जे काही कागदपत्र आहेत ते कागदपत्र सोबत आणण्यासा सांगितले होते.

**प्रश्नः** जमीन खाजगी आहे, लीज वरची आहे किंवा नगर पालीकाची आहे याची तुम्ही चौकशी केली होती का?

**उत्तरः** आमच्या ऑफीसला लीज प्रॉपर्टी संदर्भात अभिलेख असतो परंतु जागा लीज नाही.

**प्रश्नः** नझुल खाता तुमच्या कडे येत नाही का?

**उत्तरः** नझुल खाता आमच्या कार्य क्षेत्रात येते.

हे म्हणणे खरे आहे की कोणतीही मिळकत नझुल आहे किंवा नाही याची सहानिशा करण्यासाठी वाद जागेवर जाऊन चौकशी करणे अनीवार्य असते. हे म्हणणे खरे आहे की वाद जागा नझुल आहे किंवा नाही या संदर्भात चौकशी अहवाल दाखल करु शकतो त्यासाठी सुमारे १० ते १५ दिवसाचा कालावधी लागू शकते.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी (क्यु.आर. सय्यद )

दिनांक –०८/०७/२०२५ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.

**उलटतपास वादी तर्फे वकिल आर.आय.अग्रवाल यांच्यामार्फत शपथेवर सुरू**

22. Learned Advocate for plaintiff objected to Exhibit document below List Exh.82. But Document exhibited as Exhibit No.83 for identification purpose by keeping procedure to prove open.

२३. हे म्हणणे खरे आहे की वाद जागा मी किंवा माझे वडील कोणीही खरेदी केलेली नाही. Learned Advocate for defendant objected to said question on the ground that said question is out of pleading. Under Section 46 to 52 of Indian Evidence Act any question can ask in cross-examination hence objection overruled.

२४. हे म्हणणे खरे आहे की वाद जागा सर्व प्रथम लक्ष्मीचंद अग्रवाल यांच्या मालकीची होती. लक्ष्मीचंद अग्रवाल हे माझे आजोबा लागतात. हे म्हणणे खरे आहे की वादी क्र.१ ते ३ यांचे लक्ष्मीचंद अग्रवाल आजोबा लागतात. लक्ष्मीचंद अग्रवाल यांना चार मुले मीनामल, राधेश्याम, हरीशंकर, कांताप्रसाद असे होते. मीनामल यांना कोणतेही वारस नाही. कांताप्रसाद याची पत्नी व मुलगा यांचे निधन झालेले असल्यास व त्यांना त्यानंतर कोणीही वारसदार नाही. हे म्हणणे खरे आहे की राधेश्याम अग्रवाल व हरीशंकर अग्रवाल यांचे सर्व वारसदारांचे नाव अभिलेखावर आहे.

२५. हे म्हणणे खरे आहे की वाद जागा ही खाजगी मिळकत आहे. माझ्या आजोबाने वाद जागा खरेदीकरुन सुमारे ७० ते ८० वर्ष झाले असावे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलाच्या आधी वाद जागेवर कांताप्रसाद राहत होते व जागेची कर वगैरे तेच भरायचे. आता मला अभिलेखावरील नि.क्र.७० वरील दस्त दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की सदरील दस्तावर कांताप्रसाद अग्रवाल यांचे नाव लिहीले आहे. आता मला नि.क्र.७१ वरील दस्त दाखविण्यात आला. सदरील दस्त मुन्सीपल कर आकारणी बाबत आहे त्यावर लक्ष्मीचंद मातादीन अग्रवाल यांचे नाव लिहीले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी व माझ्या आई वडीलांनी आपले नाव मुन्सीपल अभिलेखात लावण्याचा प्रयत्न केला नाही. लक्ष्मीचंद, मीनामल व कांताप्रसाद यांचे निधनानंतर राधेश्याम व हरीशंकर हे दोघेच वारसदार राहतात. हे म्हणणे खरे आहे की वाद जागेचे आजतागायत पार्टीशन झालेले नाही.

२६. हे म्हणणे खरे आहे की वाद जागेचे कुणीही दान पत्र, इच्छापत्र व हक्क सोड पत्र तयार केलेले नाही. साक्षदार स्वतःहून सांगतो की माझी आत्या ताराबाई यांनी त्यांचा हक्कसोड पत्र करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की माझी आत्या कमलाबाई यांनी आजतागायत वाद जागेवर हिस्सा मागितला नाही. हे म्हणणे खरे आहे की वादी व हरीशंकर यांनी देखील वाद जागेचे हक्क सोड पत्र दस्तवीज केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की

हरीशंकर यांच्या वारसदारांचे अर्धा हिस्सा व राधेश्याम यांच्या वारसदारांचे वाद जागेवर अर्धा हिस्सा आहे.

२७. हे म्हणणे खरे नाही की दावा दाखल केल्यानंतर वाद जागेवर मी बांधकाम केले. साक्षदार स्वतःहून सांगतो की जुने बांधकाम असल्याने त्याचे डागडुगीचे काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की वाद जागेवर मनिहारी वगैरेचे काम करत होता साक्षदार स्वतःहून सांगतो की हात ठेल्यावर मनिहारीचे काम करत होता दुकानात नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीने वाद जागेवर त्याचे सामान ठेवले होते. सद्या आम्ही वाद जागेचे डागडुगीचे काम केले आहे बांधकाम सुमारे ६०–७० वर्ष जुने आहे. हे म्हणणे खरे नाही की बांधकाम लक्ष्मीचंद यांनी केले होते साक्षदार स्वतःहून सांगतो की राधेश्याम अग्रवाल यांनी बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे आहे की बांधकाम केल्याचे कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. साक्षदार स्वतःहून सांगतो की फक्त डागडुगीचे काम केले होते. हे म्हणणे खरे आहे की वाद जागेत राहण्याआधी सन २०१२ पर्यंत जुनी भाजी मंडी कामठी येथे राहत होतो.

२८. वाद जागेवर आमची दुकान सन २०१२ पासून नसून सन १९९४ पासून आहे. हे म्हणणे खरे आहे की वाद जागेवर बांधकाम परवाना घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की कांताप्रसाद यांच्या मुलाच्या निधनानंतर क्रियाक्रम वाद जागेवर करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की लक्ष्मीकांत अग्रवाल ज्यावेळी वाद जागेवर राहत होते त्यावेळी आमचे काही हस्तक्षेप नव्हते साक्षदार स्वतःहून सांगतो की तेथे आमचे सामान ठेवलेले होते. आम्ही तेथे राहत नव्हतो तेथे दुकान होते. हे म्हणणे खरे आहे की लक्ष्मीकांत अग्रवाल ज्यावेळी वाद जागेवर राहत होते त्यावेळी आम्ही व राधेश्याम अग्रवालचे वारसदार जुनी भाजी मंडी कामठी येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की वादीला त्यांचा पंन्नास टक्के हिस्सा मिळण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण फेरतपास नाही.**

**प्रतिवादी क्र.६ यांनी नि.क्र.८० वरील दिलेल्या पुर्सीस नुसार उलटतपास काही नाही असे आदेशीत करण्यात येते.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी (क्यु.आर. सय्यद )

दिनांक –२०/११/२०२५ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.

**नि.दि.दा.क्र. ५६/२०१८** **नि. क्र.८४**

**उलटतपास वादीतर्फे श्री आर. आय. अग्रवाल यांच्यामार्फत शपथेवर सुरू**

२२. हे म्हणणे खरे आहे की वाद जागेचे मुळ मालक लक्ष्मीचंद अग्रवाल हे होते त्यांचे निधन होऊन ५० ते ६० वर्ष झाले असावे. हे म्हणणे खरे आहे की लक्ष्मीचंद यांना चार मुले होते. त्यांची नावे मिनामल, हरीशंकर, राधेश्याम व कांताप्रसाद असे आहे. हे म्हणणे खरे आहे की मिनामल व कांताप्रसाद यांचे निधन झाले आहे त्यांना कोणीही वारस नाही. हे म्हणणे खरे आहे की वादी हरीशंकरचे वारस व प्रतिवादी राधेश्याम यांचे वारस आहे. ते सर्व दाव्यात शामील आहे. साक्षदार स्वतःहून सांगतो की त्यांना बहीनी पण होत्या. हे म्हणणे खरे नाही की राधेश्याम यांना अर्धा व हरीशंकर यास अर्धा हिस्सा येतो. आता मला अभिलेखावरील दस्त नि.क्र.७० व ७१ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की दोन्ही दस्तावर लक्ष्मीचंद अग्रवाल यांचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की आम्ही कधीही लक्ष्मीचंद च्या वारस असल्याचे अभिलेखावर बदल करण्याची कार्यवाही केली नाही. साक्षदार स्वतःहून सांगतो की आम्हास कधीही गरज पडली नाही. हे म्हणणे खरे आहे की जमीनीची नक्शा पास करण्याची कोणतेही कार्यवाही केली नाही. हे म्हणण खरे नाही की आमच्या आधी कांताप्रसाद यांचा कब्जा होता. हे म्हणणे खरे नाही की हरीशंकर यांचा वारसानचा कब्जा होता. हे म्हणणे खरे आहे की मी व आमचा परिवार आधी जुनी भाजी मंडी कामठी येथे राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की वाद जमीनीवरील स्ट्रक्चर खाजगी जागा आहे. साक्षदार स्वतःहून सांगतो की जमीनीवरील स्ट्रक्चर सरकारने बनवलेले नाही. साक्षदार पुन्हा सांगतो की आम्ही स्वतः बनवलेला आहे. त्याचा दस्त अभिलेखावर दाखल नाही. साक्षदार स्वतहून सांगतो की कच्चा बांधकाम आहे. हे म्हणणे खरे आहे की इमारतीचे स्ट्रक्चर कांताप्रसादच्या हयाती मधील आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या पुराव्या शपतपत्रातील परिच्छेद क्रमांक १४ मधील मजकुरा मध्ये केलेल्या बांधकामाचे कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. साक्षदार स्वतःहून सांगतो की आम्ही फक्त टिन बदलले होते. घराची लांबी रुंदी १२ x ३४ असे आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी प्लेंटीफचा हिंस्सा बळकविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी (क्यु.आर. सय्यद )

दिनांक –१७.०२.२०२६ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.